# अ‍ॅग्रोमेट अ‍ॅडवायझरी बुलेटीन
## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, कोल्हापूर
## विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर

दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६ ईमेल: adrkolhapur@rediffmail.com

**हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. ३१.०७.२०२६**

**जिल्हा : सातारा**

| मागील आठवड्यातील हवामान (२५.०७.२०२६ ते ३१.०७.२०२६) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (०१.०८.२०२६ ते ०५.०८.२०२६) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २५ | २६ | २७ | २८ | २९ | ३० | ३१ | दिनांक | ०१ | ०२ | ०३ | ०४ | ०५ |
| - | - | - | - | - | - | - | पाऊस (मिमी) | २० | १० | ७ | ५ | ५ |
| - | - | - | - | - | - | - | कमाल तापमान (अं.से.) | २७ | २७ | २९ | ३० | ३० |
| - | - | - | - | - | - | - | किमान तापमान (अं.से.) | २२ | २३ | २४ | २४ | २४ |
| - | - | - | - | - | - | - | ढग स्थिती (आकाश) | ८ | ६ | ६ | ६ | ७ |
| - | - | - | - | - | - | - | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ९६ | ९४ | ९५ | ९५ | ९५ |
| - | - | - | - | - | - | - | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ८१ | ७२ | ७४ | ७० | ७० |
| - | - | - | - | - | - | - | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | २२ | २४ | १८ | १९ | १७ |
| - | - | - | - | - | - | - | वाऱ्याची दिशा | प.नै. | प.नै. | प.नै. | प.नै. | प.नै. |

## हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश | | प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार सातारा जिल्ह्यामध्ये १, २,३, ४ व ५ ऑगस्ट रोजी आकाश ढगाळ राहण्याची शक्यता आहे. सातारा जिल्ह्यातील घाट भागात १, २ व ३ ऑगस्ट रोजी बऱ्याच ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या तर ४ आणि ५ ऑगस्ट रोजी घाट भागात काही ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची शक्यता आहे. मध्य व पूर्व भागात १, २ व ३ ऑगस्ट रोजी काही ठिकाणी हलक्या स्वरुपाच्या पावसाची तसेच ४ आणि ५ ऑगस्ट रोजी तुरळक ठिकाणी हलक्या स्वरुपाच्या पावसाची शक्यता आहे. सातारा जिल्ह्यामध्ये ५ ऑगस्ट पर्यंत कमाल तापमान २९.० ते ३०.० अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याची तसेच किमान तापमान २२.० ते २४.० अंश सेल्सिअस या दरम्यान राहण्याची शक्यता आहे. सकाळची सापेक्ष आद्रता ९४ ते ९५% या दरम्यान, दुपारची सापेक्ष आद्रता ७० ते ८१% या दरम्यान राहण्याची तसेच वाऱ्याचा वेग ताशी १७ ते २२ किमी या दरम्यान राहण्याची शक्यता आहे. |
| विस्तारित श्रेणी अंदाज | | विस्तारित श्रेणीच्या अंदाजानुसार मध्य महाराष्ट्रामध्ये दिनांक ३१ जुलै ते ६ ऑगस्ट दरम्यान पावसाचे प्रमाण सरासरी पेक्षा कमी राहण्याची, कमाल तापमान सरासरी पेक्षा जास्त राहण्याची तसेच किमान तापमान सरासरी पेक्षा जास्त राहण्याची शक्यता आहे. ७ ते १३ ऑगस्ट दरम्यान पावसाचे प्रमाण सरासरी पेक्षा कमी राहण्याची, कमाल तापमान सरासरी दरम्यान राहण्याची तसेच किमान तापमान सरासरी दरम्यान राहण्याची शक्यता आहे. |
| हवामान इशारा | | ३१.०७.२६ – घाट भाग – काही मुसळधार ते अति मुसळधार स्वरुपाच्या पावसाची तसेच तुरळक ठिकाणी अत्यंत मुसळधार स्वरुपाच्या पावसाची शक्यता आहे.<br>०१.०८.२६ – घाट भाग – तुरळक ठिकाणी मुसळधार स्वरुपाच्या पावसाची शक्यता आहे.<br>०२.०८.२६ – घाट भाग – तुरळक ठिकाणी मुसळधार स्वरुपाच्या पावसाची शक्यता आहे.<br>०३.०८.२६ – घाट भाग – तुरळक ठिकाणी मुसळधार स्वरुपाच्या पावसाची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | ❖ शेतकरी बांधवांनी हवामान आधारित शेतीविषयक सल्ला आपल्या अँड्रॉइड मोबाईलवर मिळविण्यासाठी गुगल प्ले स्टोअर वरून " मेघदूत" अँड्रॉइड अ‍ॅप्लिकेशन तर मेघगर्जना व विजांचा कडकडाट इ.च्या अंदाजासाठी "दामिनी" अँड्रॉइड अ‍ॅप्लिकेशन डाउनलोड करावे व त्याचा वापर करावा.<br>❖ कीटकनाशके व बुरशीनाशकांची फवारणी पावसाची ३ ऑगस्ट नंतर पावसाची उघडीप पाहून आणि वारा शांत असताना करावी. |
| संदेश | | मुसळधार पावसाचा इशारा असल्याने घाट भागातील शेतकरी बांधवांनी शेतामध्ये साठणाऱ्या पावसाच्या पाण्याचा त्वरित निचरा होईल याची व्यवस्था करावी |
| भात | पुनर्लागवड | ➢ घाट भागात मुसळधार पावसाची शक्यता असल्याने शेतामध्ये पावसाच्या साठणाऱ्या अतिरिक्त पाण्याचा निचरा होईल याची व्यवस्था करावी.<br>➢ भात पिकाच्या वाढीच्या अवस्थेनुसार भात खाचरातील पाण्याची पातळी रोप लागणीपासून रोपे स्थिर होईपर्यंत १ ते २ से.मी तर रोपांच्या वाढीच्याअवस्थेत २ ते ३ से.मी. ठेवावी.<br>➢ काही ठिकाणी पाने गुंडाळणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव येत आहे नियंत्रणासाठी १ ऑगस्ट नंतर पावसाची उघडीप पाहून व वारा शांत असताना क्लोरॅनट्रॅनिलीप्रोल १८.५ एस.सी. ३.० मि.ली. किंवा फ्ल्युबेन्डॅमाईड ३९.३५ एस.सी. १.० मि.ली. प्रति १० लिटर पाण्यातून फवारणी करावी. |
| मका | शाकिय वाढ | ➢ जमिनीमध्ये पुरेसा ओलावा असेल त्या भागात शेतकरी बंधु कमी कलावधीत येणाऱ्या मका वाणांची तसेच मधु मकाची लागवड करू शकतात. लागवड शक्यतो सरी ओरंब्यावर ७५ x २० सेमी अंतरावर करावी<br>➢ पेरणीनंतर २० ते २५ दिवसांनी फुले सूक्ष्म अन्नद्रव्य ग्रेड-II ची फवारणी करावी.<br>➢ मक्यावरील लष्करी अळीच्या सर्वेक्षणासाठी एकरी ५ कामगंध सापळे वापरावेत आणि शेताचे प्रत्यक्ष निरीक्षण करावे. |

दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६ ईमेल: adrkolhapur@rediffmail.com

| | | |
|---|---|---|
| | | ➢ रोपावस्था ते सुरुवातीची पोंग्याची अवस्था या कालावधीत मक्यावरील लष्करी अळीमुळे ५% प्रादुर्भावग्रस्त झाडे आढळल्यास मेटारायझीयम अनिसोप्ली किंवा मेटारायझीयम रीलेयी या जेविक बुरशीनाशकांची ५० ग्रॅम प्रती १० लिटर पाणी या प्रमाणात पोंग्यामध्ये द्रावण जाईल अशाप्रकारे फवारणी करावी.<br>➢ किडीचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीच्या जवळ दिसून येत असल्यास ५ टक्के निबोळी अर्क किंवा ॲझाडिरॅक्टिन १५०० पीपीएम ५० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे.<br>➢ फवारणी १ ऑगस्ट नंतर पावसाची उघडीप पाहून व वारा शांत असताना करावी |
| ऊस | शाकिय वाढ | ➢ पुढील ४ ते ५ दिवस मुसळधार स्वरुपाच्या पावसाचा इशारा असल्याने ज्या ठिकाणी आडसाली ऊस लागवड झालेली आहे अश्या शेतामध्ये पावसाचे पाणी साठून राहणार नाही याची काळजी घ्यावी. पावसाच्या साठणाऱ्या पाण्याचा त्वरित निचरा होईल यासाठी चर काढून व्यवस्था करावी<br>➢ आडसाली लागण करण्यासाठी को ८६०३२, फुले २६५ व फुले ऊस १५०१२, फुले ऊस १३००७ आणि फुले ऊस १५००६ यापैकी कोणत्याही शिफारशीत वाणांची जमिनीच्या मगदूरानुसार उपलब्धता करून घ्यावी.<br>➢ ऊस पिकावर काही ठिकणी गवताळ वाढ या रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. प्रसार रोखण्यासाठी प्रादुर्भाव ग्रस्त रोपे उपटून शेतापासून लांब जाळून नष्ट करावीत.<br>➢ मागील आठवड्यामध्ये वाढलेल्या आद्रतेमुळे काही ठिकाणी तपकिरी ठिपके व तांबेरा या रोगांचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. नियंत्रणासाठी १ ऑगस्ट नंतर पावसाची उघडीप पाहून शिफारशीत बुरशीनाशकाचा वापर करावा |
| सोयाबीन | शाकिय वाढ | ➢ पिकात अतिरिक्त पाणी साठले असल्यास पाण्याचा त्वरित निचरा करावा.<br>➢ सोयाबीन मध्ये पाने खाणाऱ्या अळयांचा प्रादुर्भाव दिसून येत आहे नियंत्रणासाठी जमिनीपासून ३ फुट उंचीवर एकरी ३ या प्रमाणात स्पोडोल्युर असलेले कामगंध सापळे लावावेत. तसेच एकरी २० पक्षी थांबे उभे करावेत.<br>➢ फुले सुपर बायोमिक्स १० मिली प्रति लिटर पाण्यात मिसळून त्वरित फवारणी फायदेशीर ठरेल. अथवा क्लोरएन्ट्रानिलीप्रोल+ लॅम्बडासायहॅलोथ्रीन हे कीटकनाशक ४ मिली प्रति दहा लिटर पाण्यात मिसळून फवारावे.<br>➢ पिवळा अथवा हिरवा मोजॅक रोगाने बाधित रोप आढळल्यास त्याचा त्वरित नायनाट करावा. |
| भुईमूग | वाढीची अवस्था | ➢ १० ते १२ दिवसांच्या अंतराने २ ते ३ कोळपण्या कराव्यात व २ खुरपण्या कराव्यात. शेवटची खुरपणी थोडी खोल द्यावी त्यामुळे पिकास मातीची भर मिळते. भुईमूगच्या आऱ्या जमिनीत जाण्यास सुरुवात झाल्यावर आंतरमशागत करू नये.<br>➢ सततचा पाऊस आणि हवेतील जास्त आद्रता यामुळे भुईमुग पिकावर टिक्का आणि तांबेरा या रोगांचा प्रादुर्भाव होऊ शकतो. प्रादुर्भाव दिसून येताच नियंत्रणासाठी फ्ल्यूबेनडॅमाईड ३.५% + हेक्झाकोनॅझोल ५% डब्ल्यू. जी. २५ ग्रॅम १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे.<br>➢ घाट भागात जोरदार स्वरुपाच्या पावसाची शक्यता असल्याने शेतामध्ये पावसाच्या साठणाऱ्या पाण्याचा निचरा करावा. |
| मिरची | शाकिय वाढ | ➢ मुसळधार पावसाची शक्यता असल्याने मिरची पिकामध्ये पावसाच्या साठणाऱ्या अतिरिक्त पाण्याचा निचरा होईल ही व्यवस्था करावी.<br>➢ रसशोषक किडींच्या निरीक्षण व नियंत्रणासाठी एकरी २० ते २५ निळे चिकट सापळे लावावेत. |
| हळद | वाढीची अवस्था | ➢ मुसळधार पावसाची शक्यता असल्याने हळद पिकामध्ये पावसाच्या साठणाऱ्या अतिरिक्त पाण्याचा निचरा होईल याची व्यवस्था करावी.<br>➢ काही ठिकाणी शेतामध्ये पाणी साठून राहिल्याने कंदकुजीचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. प्रादुर्भाव दिसून येताच सुरळीतील पानांचे शेंडे व कडा पिवळे पडून १ ते १.५ से.मी. खालीपर्यंत वाळत जातात आणि पुढे पान संपुर्णपणे वाळले जाते. खोडाचा जमिनीलगतचा बुंधा व गड्डा काळपट, राखाडी पडतो. गड्डयावर दाब दिला असता त्यातून कुजलेले, घाण वास येणारे पाणी बाहेर येते.<br>➢ नियंत्रण : लागवडीसाठी रोगमुक्त बियाणे वापरावे, उत्तम निचरा होणारी जमिन निवडावी. शेतात पाणी साचू देऊ नये.<br>➢ वेळेवर भरणी करावी. कंदवर्गिय पिकांवर पुन्हा कंदवर्गीय पीक घेऊ नये. ॲझोक्झिस्ट्रॉबीन + डायफेनकोनॅझोल १० मिली प्रती १० लिटर पाण्यातून फवारणी करावी. पीक लागवडीच्या वेळी ट्रायकोडर्मा प्लस ५ किलोग्रॅम प्रति हेक्टरी शेणखतातून मिसळून द्यावे. |
| आले | शाकिय वाढ | ➢ मुसळधार पावसाची शक्यता असल्याने आले पिकामध्ये पावसाच्या साठणाऱ्या अतिरिक्त पाण्याचा निचरा होईल याची व्यवस्था करावी. |
| पशुधन | वाढीची | ➢ मागील काही दिवसांपासून पाऊस, उघडीप आणि पुन्हा पाऊस अशा बदलत्या हवामानामुळे जनावरांच्या गोठ्यात डास, माश्या व गोचिडींचे प्रमाण वाढण्याची शक्यता आहे. त्यांच्या नियंत्रणासाठी गोठा व परिसर स्वच्छ आणि कोरडा ठेवावा तसेच गोठ्यात नियमितपणे धुरी करावी. विशेषतः गोचिडींचे वेळीच नियंत्रण केल्यास जनावरांना थायलेरिओसिस रोगापासून संरक्षण मिळू शकते.<br>➢ इशारा कालावधी दरम्यान जनावरे बाहेर चारावयास सोडू नयेत |

| मेघदूत ॲप्लिकेशन डाउनलोड करण्यासाठी स्कॅन करावे | दामिनी ॲप्लिकेशन डाउनलोड करण्यासाठी स्कॅन करावे |
|---|---|

स्त्रोत
१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

ठिकाण : कोल्हापूर
दि. : ३१.०७.२०२६

स्वाक्षरीत
प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, कोल्हापूर तथा
सहयोगी संशोधन संचालक,
विभागीय कृषि संशोधन केंद्र , कोल्हापूर